# श्री. शामराव गजानन निनावे

व्यवस्थापक : परमात्मा एक सेवक दूध उत्पादक सह. संस्था
सेवक क्र. ८६३ सालईमेंटा, तह. रामटेक, जि. नागपूर
मुळ पत्ता : खापा, तह. सावनेर, जि. नागपूर

मी हे तत्त्व स्वीकारण्याच्या अगोदर शारीरिक व आर्थिक दृष्टीने अत्यंत दुःखी होतो. माझे लग्न झाल्यावर मी नेहमी आजारी पडत होतो. माझी पत्नीसुध्दा आजारी पडत होती. पत्नीला प्रदराचा आजार सुरु झाला. माझ्या मूत्रपिंडाला बारीक फोड झाले होते. आम्ही दोघांनीही अनेक डॉक्टरांचा औषधोपचार घेतला पण दोघांनाही फायदा झाला नाही. त्यानंतर मांत्रिक लोकांचेही उपचार घेतले पण दोघांनाही तात्पुरताच फायदा झाला. शेवटी मी लघवीच्या आजाराने अत्यंत त्रासून गेलसे. लघवी होणे एकदम बंद झाले. अंगावर सूज आली. शेवटी मी मेडीकल कॉलेजमध्ये भरती झालो. तेरा दिवस माझी लघवी बंद होती. मी बेशुध्दावस्थेतच होतो. मी जिवंत राहतो की नाही अशी शंका निर्माण झाली. वैद्यकीय उपचारांसोबतच मंत्रतंत्राचाही उपचार सुरुच होता. त्या मंत्रतंत्रोपचाराने व औषधोपचाराने मी बरा झालो. दवाखान्यातून घरी आल्यावर सर्व देवांचे नवस फेडले. सर्व देवाची पुजा दिली तरीही पुनः एक आठवड्यानंतर प्रकृती बिघडली व लघवी बंद झाली. पुन्हा मांत्रिक उपचाराने प्रकृती सुधारली. शेवटी मी मांत्रिक उपचारांना कंटाळलो बाबांचा मार्ग स्वीकारावा असा विचार मनात आला. श्री. घनश्यामजी बुरडे, खापा यांच्याकडे जाऊन बाबांच्या मार्गाबद्दल विचारपूस केली. कुटुंबातील सर्वांशी सर्व गोष्टींचा विचार करुन एकच भगवंताच्या चरणी मरण्याकरिता हा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. अकरा दिवसांची साधी अगरबत्ती सुरु केली. या दिवसात आम्हा दोघांनाही बरे वाटू लागले. त्यानंतर आम्ही दोघे भाऊ महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे आलो. त्यांना आमच्या व्याधीची माहिती दिली. अकरा दिवसांत आम्हाला समाधान मिळाले, हे पण बाबांना सांगितले. मला स्वप्नात साप दिसत असे. त्यामुळे मला खुप भिती वाटत असे. म्हणून मी बाबांना विचारले बाबा, मला स्वप्नात नेहमी साप दिसतो स्वप्नात साप दिसणे बंद होईल काय? त्यावर बाबांनी उत्तर दिले, मी आता काहीच सांगू शकत नाही. त्याकरिता तू स्वतःच प्रयत्न कर व स्वतः अनुभव घे व नंतर मला सांग. बाबांचे उत्तर ऐकून माझे समाधान झाले. मी प्रयत्नात लागलो म्हणून आज सुखी झालो असहे. बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्य सुरु करण्याआधी घरी असलेला देव्हारा उचलून फेकून दिला. बेचाळीस दिवसांचे त्यागाचे कार्ये चालू असताना माझा

डाव पाय पूर्णपणे सडून गेल्यासारखा झाला व त्यातून खूप पाणी निघू लागले. तसेच माझ्या सहा महिन्यांच्या मुलाच्या शरीराला व हातापायांना खरुज झाली. तीळ ठेवायलाही जागा नव्हती. त्यागाचे कार्य चालू असतांना औषधोपचार करता येत नाही हे मला माहीत होते म्हणून मी स्वतःकरिता व मुलांकरिता खोबरेल तेलामध्ये सेवकांच्या घरुन आणलेली हवनकार्याची रक्षा मिसळून माझ्या पायाला व मुलाच्या शरीराला लावली. तेव्हा बिना औषधोपचाराने दोघांचीही व्यथा नाहीशी झाली. माझ्या मुलाचे केस व नखे गळून गेले होते. ते बेचाळीस दिवसांच्या कार्यात पूर्णपणे आले. माझ्या पत्नीचा प्रदराचा आजारसुध्दा बरा झाला. अशाप्रकारे परमेश्वराने माझ्या कुटुंबाला दुःखातून मुक्त केले. व मार्गावर आल्यामुळे आमची नातेवाईकांशी ताटातूट झाली. मामांशी वैर निर्माण झाले. मी सगळ्यांची आशा सोडून सेवकांनाच आपले भाऊ समजून प्रेमाने वागत आहे. हेच माझे नातेवाईक आहेत असे मला वाटत आहे. अशाप्रकारे बाबांनी माझे नवीन नातेवाईक जोडून दिले. सेवकांच्या प्रेमाने मी भारावून गेलो.

एक दिवस बाबा खाप्याला आले. बाबांना चहापानी घेण्याकरिता आमच्या घरी येण्याची विनंती करण्यास मी गेलो. बाबा माझ्या विनंतीला मान देऊन माझ्या घरी आले. बाबा सर्व सेवकांचे प्रिय आहेत. बाबा घरी आल्यावर मी विनंती केली की बाबा मी बी.कॉम. पर्यंत शिकलेला असून मला नोकरी नाही. मला मार्गावर यायच्या आधी किडणीची बिमारी होती. तेव्हापासून माझ्याने विणकामही होत नाही. आपण आपल्या बँकेत मला नोकरी द्याल अशी आशा मी बाळगतो. बाबा म्हणाले, तुम्ही बँकेमध्ये अर्ज करा. योग येईल तेव्हा नोकरी मिळेल. थोड्याच दिवसात भंडारबोडी येथे दूध डेअरी निघाली आणि बाबांच्या कृपेने मला त्या ठिकाणी व्यवस्थापक म्हणून ठेवण्यात आले. बाबांच्या कृपेने माझा नोकरीचा प्रश्न सुटला. मी ह्या मार्गावर आल्यापासून माझ्या कुटुंबात सुख, शांती अणि समाधान लाभत आहे. बाबांनी दिलेले तत्त्व, शब्द आणि नियमांचे मी जीवनात पालन करीन असे सत्य वचन देत आहे.

* * * * *